महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा क्रः तंशिविकापु/विवि/केआरए-ड्रोन स्कूल्स/२०२२/४५३९

दिनांक : २८.०९.२०२२
29 SEP 2022

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित
**पदविका अभियांत्रिकी** अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाकरीता विभागासाठी निश्चित केलेल्या महत्वाची फलनिष्पती क्षेत्रे (KRA) मासिक आढाव्याअंतर्गत Drone School & Technology बाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती करणेबाबत..

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र जा.क्र. १६/आस्था/केआरए बैठक/२०२२/२९० दिनांक १३.०९.२०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन, शासनामार्फत तंत्रशिक्षण विभागासाठी सन २०२२-२३ करिता महत्वाची फलनिष्पती क्षेत्रे (KRA) बाबतची सद्यस्थिती कळविण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर मुद्यांमध्ये Drone School & Drone Technology या मुद्याचा समावेश आहे.

संदर्भीय पत्राद्वारे प्राप्त निर्देशांनुसार, या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विना अनुदानित पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की, उपरोक्त मुद्याच्या अनुषंगाने संस्थास्तरावर खालील प्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

- **तंत्रनिकेतनातील विद्यार्थी यांचेकरीता Drone महोत्सव व मेळा आयोजन करणे**
- **तंत्रनिकेतनातील विद्यार्थी यांचेकरीता Drone Technology व औद्योगिक क्षेत्रातील वापर या विषयाबाबत कार्यशाळा आयोजित करणे.**

वर नमूद कार्याक्रमां व्यतिरिक्त Drone School & Drone Technology या मुद्यांच्या अनुषंगाने अन्य काही अधिकचे कार्यक्रम संस्था / कार्यालय स्तरावर राबवायचे असल्यास, राबविण्यात यावेत.

संस्था / कार्यालय स्तरावर राबविण्यात येणा-या Drone महोत्सव / मेळा व कार्यशाळांच्या नियोजनाबाबतचा तारखांसह तपशिलवार अहवाल या विभागीय कार्यालयास सादर करावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे यांनी त्यांच्या स्तरावरून पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थांना उपरोक्त कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने प्रोत्साहीत करावे.